# शेतकरी संघटक

पाक्षिक

वार्षिक वर्गणी रु. २५

किंमत १ रुपया

वर्ष ९ वे | २१ मे १९९२ | अंक ४ था


# दुष्काळाची झळ शेतकऱ्यांनाच का ?

**— शरद जोशी**

**प्रिय मोहनजी,**

**सप्रेम नमस्कार.**

**विषय : महाराष्ट्रातील वारंवार पडणारा दुष्काळ कायम हटविण्यासाठी...**

वरील विषयावरील आपले ५ मे १९९२ चे पत्र मिळाले. वर्तमानपत्रांतील बातम्यांवरून, असेच पत्र आपण वेगवेगळ्या राजकीय संघटना व राजकीय पक्ष्यांचे नेते तसेच स्वयंसेवी संघटनांच्या कार्यकर्त्यांनाही पाठविले आहे असे कळते.

महाराष्ट्रात सध्या पिण्याच्या पाण्याची मोठी हलाखी झाली आहे. जनावरांना घालण्यासाठी चारासुद्धा दुरापास्त झाला आहे. काही किरकोळ अपवाद सोडता, माणसांचे भूकबळी कोठे होतील असा काही मोठा धोका दिसत नाही. 'भूकबळी म्हणजे पोटात घालायला अन्न सतत आठवडे आणि आठवडे मिळालेच नाही म्हणून येणारा मृत्यु' या अर्थाने भूकबळी होणार नाहीत. पण कुपोषणामुळे येणारी शारीरिक कमजोरी आणि त्यामुळे होणारे व पसरणारे आजार लक्षात घेतले तर असे भूकबळी सुकाळाच्या वर्षीसुद्धा होतात; दुष्काळाच्या वर्षी अशा बळींची संख्या वाढेल, एवढेच काय ते ! पोटात घालावयास काही मिळाले नाही म्हणजे काहीही वेडेवाकडे, अरबट चरबट भुकेलेला माणूस पोटात घालतो आणि त्यातून गॅस्ट्रोपासून ते विषबाधेपर्यंत अनेक आजार उद्‌भवून ते त्या बिचाऱ्याचा प्राण हिरावून घेऊ शकतात. असे भूकबळीही वर्षानुवर्षे घडत असतात, यंदाही घडतील.

परिस्थिती गंभीर आहे याची शाब्दिक आणि तोंडदेखली जाणीव तरी सर्वत्र आहे. मुख्यमंत्र्यांनी इतर सर्व खात्यांची अंदाजपत्रके

## महाराष्ट्रातील वारंवार पडणारा दुष्काळ कायम हटविण्यासाठी....

महाराष्ट्रातील दुष्काळी परिस्थितीकडे शासनाचे लक्ष वेधण्याच्या उद्देशाने विरोधी पक्षांनी अलिकडेच 'महाराष्ट्र बंद' चा कार्यक्रम साजरा केला. शासनही दुष्काळग्रस्त जनतेला दिलासा देण्यासाठी काही ना काही कार्यक्रम राबविण्याचा घोषणा करीत आहे. तर इकडे वनराई व इतर काही स्वयंसेवी संघटना व संस्था जनता, शासन, सर्व राजकीय पक्ष, सामाजिक, शैक्षणिक व सहकारी संस्था, जिल्हा परिषदा व इतर संघटना यांना एकत्र आणून दुष्काळाची समस्या कायमची हटविण्यासाठी एक धडक कार्यक्रम युद्धपातळीवर राबविण्याचे ठरवीत आहेत. हे काम करण्यासाठी जो ठोस कार्यक्रम आखला आहे त्यासाठी एकत्र येण्यापासून पाणी अडविणे व जिरविणे; पाझर तलाव, बंडींग, नालाबंडींग इत्यादींची शास्त्रीय पद्धतीने दुरूस्ती, ऐतिहासिक तलाव, विहिरी इत्यादींचा जार्णोद्धार; नदीकिनाऱ्यांनी विहिरीवजा खड्डे; कच्चे बंधारे; पाणलोट क्षेत्रांची निगा; शिक्षणसंस्था ऑगस्टपर्यंत बंद ठेवून त्यातील विद्यार्थी, प्राध्यापकांना या कार्यक्रमात सहभागी करून घेणे; कमी पाण्यात अधिक उत्पादन देणारी शेती करण्यास प्रात्साहन देणे; यासाठी लागणारा निधी शासन व जनतेकडून जमविणे इत्यादी सोळा कलमांचा अंतर्भाव आहे.

'वनराई' चे अध्यक्ष श्री. मोहन धारिया यांनी श्री. शरद जोशींना या कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी निमंत्रण देणारे पत्र पाठविले आहे. 'दुष्काळ हा निसर्गनिर्मित नसून मानवनिर्मित आहे आणि त्याचे मूळ शेतीच्या लुटीत आहे, ती लूट थांबली तरच दुष्काळ हटू शकेल' ही आपली भूमिका शेतकरी संघटनेने गेली दहा वर्षे सातत्याने मांडली आहे. श्री. शरद जोशींनी श्री. मोहन धारियांना त्यांच्या पत्राच्या उत्तरादाखल लिहिलेल्या पत्रात ही भूमिका सविस्तरपणे मांडली आहे. शेतकरी संघटकच्या वाचकांना शेतकरी संघटनेच्या भूमिकेची उजळणी करता यावी या करता हे पत्र येथे प्रकाशित करीत आहे.

**— संपादक**

२५ ते ३० टक्क्यांनी कमी करून सिंचन आणि पाणीपुरवठा यासंबंधी प्रकल्पांकरिता रक्कम उपलब्ध करून देण्याची मोठी सनसनाटी घोषणा करून टाकली आहे. त्यासंबंधीचा निर्णय तातडीने दोनच दिवसांत भरणाऱ्या मंत्रीमंडळाच्या बैठकीत व्हायचा होता. वर्तमानपत्रांतील बातम्यांवरून, प्रस्तुत बैठकीत तो विषय निघालाच नाही असे दिसते. हे कसे घडले असेल आणि झारीतील शुक्राचार्य कोण असतील याची कल्पना करणे काही फार कठीण नाही.

सत्ताधारी पक्षाची परिस्थिती कोणत्याही दुष्काळात मोठी कठीण होते. आपण काहीतरी करतो आहोत असे दाखविणे तर त्याला आवश्यकच असते. आगीचा भडका उडून गेल्यानंतर ती तातडीने विझविण्यासाठी आगीचे बंब आणले जातात त्याचप्रमाणे दुष्काळाची दाहकता कमी व्हावी यासाठी जुजबी, तात्पुरती किंवा थातुरमातुर योजना कोणत्याही शासनाला करावीच लागते. अगदी शिवराम महादेव परांजप्यांच्या काळातसुद्धा परदेशी सरकारलादेखील खडी फोडायची कामे चालू करावी लागतच होती. आजकाल अशी कामे देण्याची जी व्यवस्था आहे तिला 'रोजगार हमी योजना' म्हटले जाते आणि पुरोगामी महाराष्ट्रातल्या कर्तृत्ववान नेत्यांनी राबविलेली क्रांतीकारी योजना असा तिचा गवगवा केला जातो. प्यायला पाणी नाही म्हणून लांबलांबून टँकर लावून पाणी गावांना पुरविले जाते; त्यासाठी अत्यंत दुर्मिळ आणि महाग अशी खनिज तेले बेहिशेबी वापरली जातात. कोठे कोठे जनावरांना चारा पुरविण्याची व्यवस्था होते, काही ठिकाणी जनावरांना आणून बांधण्याकरिता छावण्या उघडल्या जातात. हे असले प्रयत्न आणि योजना शासनाच्या आवाक्यातल्या असतात, प्रशासनाला अशा योजना राबविणे आवडते. दुष्काळाची टांगती तलवार असली म्हणजे अशा परिस्थितीत आणिबाणी असल्याप्रमाणे वागता येते. उधळमाधळ, अकार्यक्षमता थातुरमातुर कारणे सांगून बासनाआड घालता येतात. अशा योजना लोकप्रतिनिधींना आणि विशेषतः सत्ताधारी पक्षातील लोकप्रतिनिधींना सोयीस्कर वाटतात एवढेच नव्हे तर त्यांच्याकरिता दुष्काळ म्हणजे एक मोठी पर्वणीच असते. शासनाविरुद्धचा सर्व रोष, असंतोष व उद्रेक शमून जातात आणि दुष्काळाने हवालदिल झालेली जनता बाकी सगळे विसरून आपापल्या भागात चारापाणी व रोजगार यांची व्यवस्था व्हावी यासाठी आमदारांच्या घरी खेटे घालू लागतात.

विरोधी पक्षातील लोकप्रतिनिधींना त्यामानाने, दुष्काळाचा फारसा फायदा मिळत नाही. ते आरडाओरडा करू शकतात, निदर्शनेमोर्चे घडवून आणू शकतात पण दुष्काळग्रस्त जनतेला हे पक्के ठाऊक असते की काही मिळवायचे असेल तर सत्ताधारी पक्षाच्या प्रतिनिधींकडेच गेले पाहिजे. दुष्काळासारख्या संधीचा सगळाच्या सगळा लाभ राज्यकर्त्या पक्षालाच मिळतो याचे वैषम्य विराधकांना, साहजिकच टोचत असते. मग ही खदखद 'विधानसभेतील गदारोळ' किंवा 'साताठ तासांचा बंद' अशा मार्गांनी बाहेर काढण्याखेरीज त्यांना काही फारसा पर्याय नसतो.

दुष्काळामुळे जसजशी सगळी वनराई, झाडे, गवतपाला नाहीशा होऊ लागतात तसतशी एक वेगळीच वाढ सगळीकडे दिसू लागते. पावसाळा सुरू झाला की जमिनीतून वेगवेगळे प्राणी बाहेर पडू लागतात, दगडादगडाखालून कीटककिडे निघू लागतात. तसेच, दुष्काळाच्या कठोर दाहकतेतही एक वेगळी जीवसृष्टी बाहेर येते. इतर देशांतल्या प्रमाणेच भारतात आणि भारतातल्याप्रमाणेच महाराष्ट्रात पर्यावरणाशी संबंधित असलेल्या संस्थांचे पेव फुटले आहे. जगभरच आणि विशेषतः औद्योगिक दृष्ट्या प्रगत देशांत पर्यावरण हा ज्वलंत प्रश्न म्हणून भेडसावतो आहे. त्यासाठी अनेक संस्था उभ्या राहतात, प्रचंड निधीही उभे राहातात. त्यामुळे, खरूज, नारू थैमान घालत आहेत अशा प्रदेशांतसुद्धा रासायनिक प्रदूषण, ओझोन थरावरील परिणाम, ग्रीन हाऊस इफेक्ट अशी शब्दावली मिरविणारे कार्यकर्ते उदंड झाले आहेत. विषयच मुळी मोठा फॅशनेबल ! या विषयावर जागोजाग, देशीपरदेशी शेकडोहजारोंनी संवादपरिसंवाद भरत असतात; वर्तमानपत्रांत बातम्या येत असतात. अगदी किरकोळ काम करणाऱ्यांवरसुद्धा निधीचा, पारितोषकांचा आणि सन्मानांचा वर्षाव होतो. साहजिकच, पर्यावरणाचे संरक्षण हा गरीबी हटविण्याच्या कार्यक्रमाइतकाच प्रचंड आणि किफायतशीर व्यवसाय बनतो आहे.

हे सगळे काही निष्क्रीय वाचीवीर आहेत असे नाही. त्यांतील काही प्रामाणिक जाणकरांनी आपापल्या लहानशा गावात, प्रदेशात, कोपऱ्यात काही कामे करून दाखविली आहेत. आणि, भौगोलिकदृष्ट्या मर्यादित का होईना, डोळ्याला सुख वाटावे असे नमुने तयार केले आहेत. एकट्या महाराष्ट्रातच अशी पाचपंचवीस तरी उदाहरणे असतील. या नमुन्यांची आता पुनरावृत्ती सगळीकडे झाली म्हणजे पर्यावरणाचा प्रश्न संपला, पाण्याचा मिटला, दुष्काळ हटला अशी यांची भाबडी समजूत आहे. कुटुंबातले प्रश्न आणि भातुकलीच्या खेळातले प्रश्न अलग अलग आहेत याचा त्यांच्या कविमनाला विसर पडतो. त्यांच्या बरोबर असलेले बहुतेक तर हौसे, नवसे, गवसे या सदरातच मोडणारे; 'झाडे लावा म्हणजे दुष्काळ कायमचा हटेल' असल्या तर्कविसंगत घोषणा दिवसरात्र परत परत देत राहाणारे. या अशा तऱ्हेच्या संस्थांचीही दुष्काळात मोठी चलती होते.

यंदा वळीवाच्या पावसाने अगदीच डोळे वटारले आहेत. उगाच कोठे एखादी सर शिंपडून वळीव नाहीसा झाला आहे. उद्या जर का महाराष्ट्रातील वेगवेगळ्या भागांत वळीवाचे ढग भरून आले आणि जोरदार पाऊस झाला, थोडेफार का होईना, ओढे, नाले, तळी, तलाव भरून आले तर दुष्काळाचा विषय कोणाच्याच विषयपत्रिकेवर राहाणार नाही. राज्यकर्त्या पक्षाला त्याचा विसर पडेल, विरोधक काही नवीन सनसनाटी विषयाच्या शोधास लागतील आणि पर्यावरणजीवी संस्था व व्यक्ती त्यांचे परिसंवाद, अभ्यास, जाहिरनामे यांमध्ये दुष्काळाविषयी थोडे कमी बोलतील.

या दुष्काळाच्या कठीण अवस्थेत का

होईना, दुष्काळ कायम हटविण्याकरिता काही ठोस कार्यक्रम उभा करण्याचे आपण व आपल्या सहकाऱ्यांनी मनात घेतले आहे त्याबद्दल मी आपले अभिनंदन करतो. महाराष्ट्रात आजपर्यंत असा एकही दुष्काळ झाला नाही की ज्या वेळी दुष्काळाचा कायमचा बंदोबस्त करून टाकण्याची भीमगर्जना झाली नाही. या विषयावर फॅमिन् कमिशन्स् नेमण्यात आली, तज्ञ समित्या नेमण्यात आल्या, अहवाल झाले, पाण्याच्या सिंचनाच्या काही योजना झाल्या पण दुष्काळ बेटा काही कायमचा हटायला तयार नाही. आपणास नाउमेद करण्याकरिता मी हे लिहितो आहे असे नाही. उमेद गमावणाऱ्यांपैकी आपण नाही हे मी पाहातोच आहे. आणि, म्हणून काही गोष्टी आपणास लिहिण्याचे मनात आणले आहे. त्यांचाही विचार आपण करावा. १९८२ सालापासून जेव्हा जेव्हा महाराष्ट्रात कमी अधिक दुष्काळसदृश परिस्थिती तयार झाली तेव्हा तेव्हा या सर्व गोष्टी मी पुढे मांडल्या आहेत. त्यावेळी त्यांच्याकडे कोणाचे लक्ष गेले नाही. आज काही वेगळे होईल अशी अपेक्षा नाही. पण आपल्या हातून मांडणे झाले नाही अशी रूखरूख मनात राहू नये यासाठी हा सर्व प्रपंच.

आपल्या पत्रातील पहिल्याच वाक्यात आपण म्हणता,

> ”दुष्काळ हा आपल्या राज्याच्या ग्रामीण भागाचा आणि अर्थव्यवस्थेचा स्थायी भावच झाला आहे. दुष्काळ पडला की पिण्याचे की पिण्याचे पाणी, जनावरांना चारा आणि दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना काम देणे अपरिहार्य ठरते.“

या आपल्या वाक्यातच दुष्काळाच्या समस्येची गुरूकिल्ली आहे.

पाऊस अपुरा पडला की पिण्याचे पाणी, जनावरांना चारा आणि दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना काम देणे अपरिहार्य ठरते.“

या आपल्या वाक्यातच दुष्काळाच्या समस्येची गुरूकिल्ली आहे.

पाऊस अपुरा पडला म्हणजे दुष्काळ पडतो. कधीकधी अतिवृष्टी झाली तर ओला दुष्काळ होतो. दुष्काळ पडला की शेतकऱ्याचे जीवन उद्ध्वस्त होऊन जाते. पिण्याच्या पाण्यासाठी, जनावरांच्या चाऱ्यासाठी आणि जगायसाठी शेतकऱ्यांची केवीलवाणी धावपळ सुरू होते. शहरांत असे काही होत नाही. महाराष्ट्रात भले दुष्काळ पडला असेल, मुंबईच्या जीवनात कोठे तसूभरही फरक पडलेला नाही. दुष्काळी कामांवर येणारे झाडून सारे शेतकरी असतात. कोणी सरकारी कर्मचारी येत नाहीत, बँकेचे लेखनिक येत नाहीत, कारखान्यांचे कामगार नाहीत. फक्त शेतकरी तेवढा फरफटत येतो; बायकापोरांसकट येतो. खडी फोडण्याची हातांना सवय नाही, हातातून रक्त येत असले तरी चिंध्या गुंडाळून किंवा पदर गुंडाळून खडी फोडतात. त्यात सगळे येतात; शेतमजूर येतात, शेतकरी येतात. मराठवाड्यात तर अगदी वीसपंचवीस एकर जमिनीचे मालकसुद्धा दुष्काळी कामावर येतात. विदर्भ हा सधन प्रदेश. आजपर्यंत दुष्काळी कामे विदर्भात माहीत नव्हती. आता तेथेसुद्धा दुष्काळी कामांच्या छावण्या चौफेर भरू लागल्या आहेत. पाऊस कमी पडला म्हणजे गाव उद्ध्वस्त, शहर निर्धास्त. शेतकरी निर्वासित आणि शहरवासियांच्या सुखाला जराही तोशीस नाही. दुष्काळ ‘भारता’ चा आहे, ‘इंडिया’ चे सुख तो दुखावत नाही. हे काय गौडबंगाल आहे? या प्रश्नातच दुष्काळाच्या समस्येची गुरुकिल्ली आहे.

चांगला पाऊस पडला, अन्नधान्याची लयलूट झाली तर त्याचा फायदा काय एकट्या शेतकऱ्याला होतो? भाजीपाला, अन्नधान्य भरपूर येते, स्वस्ताई होते त्याने सगळे खूश होतात. शेतकऱ्यांपेक्षासुद्धा बिगरशेतकरी अधिक खूश होतात. सुबत्तेच्या वर्षी पोटात दोन घास जास्त जातात एवढाच शेतकऱ्याला आनंद. चांगले पीक आले आहे तर पुढच्या दुष्काळी वर्षासाठी बेगमी म्हणून काही मालाची, पैशाची साठवणूक करावी म्हटले तर शक्य होत नाही, कारण सगळे भाव कोसळतात, हाती काहीच राहत नाही. चांगल्या वर्षात बाकी सर्व खूश, दुष्काळात शिक्षा मात्र शेतकऱ्याला.

देशातील निम्मे उत्पन्न शेतीतून येते. शेती बंद म्हटल्यावर इतर कामे पण कमी होत असली पाहिजेत. तेथली माणसे काही दिवसतरी दुष्काळी कामावर का येत नाहीत? पाऊस कमी पडला म्हणजे फक्त शेतीचेच नुकसान होते असे नाही. धरणांत पाणी कमी पडते. कारखाने दोन दोन महिने बंद ठेवावे लागतात. त्या कारखान्यांचे मालक सोडा, कामगार तरी दुष्काळी कामावर खडी फोडायला येतात? कधीच नाही.

ते म्हणतात, ”यंदा दहाच महिने कारखाना चालला. जेवढा माल तयार झाला तेवढ्यावरच बारा महिन्यांचा खर्च टाकू, किंवा आधी झालेल्या फायद्यातून या दोन महिन्यांचा खर्च चालवू. यंत्रांचे तेलपाणी, दुरूस्ती राहिली होती; या काळात ती उरकून घेऊ. म्हणजे, वीज सुरू झाली की झपाट्याने उत्पादनाला लागू.“

त्यांना घरदार फुंकून दुष्काळी कामावर खडी फोडायला यावे लागत नाही.

दुष्काळ पडला तर शेतकऱ्यालासुद्धा म्हणता आले पाहिजे, ”यंदा पाऊसबाबाची मर्जी दिसत नाही. ठीक आहे. तो आपला काही नोकर नाही. तो आपल्या मर्जीनेच पडणार. यंदा पिकाचे काम कमी तर जमिनीची पडून राहिलेली कामे उरकून घेऊ. हरळी फार माजली आहे. नागरमुथा वेचून घ्यायला हवा. चर सावरून घ्यायला पाहिजेत, बांधबंदिस्ती सुधारायची राहिली आहे. यंदा ही कामे उरकून घेऊ म्हणजे पुढच्या वर्षी चांगला पाऊस पडला तर बंदा रुपया पीक येईल अशी व्यवस्था करू.“

शेतकऱ्याला असे का म्हणता येत नाही? त्यालाच दुष्काळी कामावर खडी फोडावयास का जावे लागते? जेव्हा चांगला पाऊस पडतो, पीक चांगले येते तेव्हाही त्याच्या हाती काही येत नाही म्हणूनच ना? आपल्या देशात दोनचार वर्षांतून एकदा दुष्काळ येतोच. शेतकऱ्यांचे हाल होतात ते पाऊस न पडल्यामुळे नाही. जेव्हा पाऊस पडतो तेव्हासुद्धा त्याला काहीच मिळत नाही म्हणून, पिकते त्यालाही भाव नाही म्हणूनच

ना? दुष्काळात शेतकरी खडी फोडतो तो त्याच्या मालाला भाव नाही म्हणून. पाण्याच्या अडचणीचेही कारण शेतकऱ्याची आर्थिक अडचणच आहे. आमच्या पूर्वजांनी जी गावे वसविली ती काही वेड्यासारखी वसविली नाहीत. तिथले पाणी संपले तर आमची हलण्याची ताकद नाही. असेल तिथून पाणी पंपाने गावाजवळ आणण्याची ताकद नाही म्हणून पाण्याचा प्रश्न आहे. शेतकऱ्याच्या प्रत्येक हलाखीचे मूळ कारण शेतीमालाला भाव नाही हेच आहे.

काय गंमत आहे पाहा. पोट भरण्यासाठी शेतकरी खडी फोडतो म्हणजे काय फोडलेली खडी पोटात भरतो काय? नाही, तो खातो ज्वारीच. ते धान्य देशात भरपूर आहे, ते पोटात घालवयास मिळावे म्हणून त्याला खडी फोडावी लागते ही काय भयानक अवस्था आहे? दुष्काळी कामावर हात फोडून घेणाऱ्या शेतकऱ्यांचे साखर कारखान्यांत पैसे ठेवीच्या रूपाने पडून आहेत; सोसायटीत, बँकेत भागाच्या रूपाने त्याचे पैसे अडकले आहेत. त्या पैशावर उचल मिळाली तरी तो खडी न फोडता पोट भरू शकेल. पण शेतीमालाला भाव नाही तोपर्यंत हे शक्य होणार नाही. त्याला खडीच फोडावी लागणार आहे.

म्हणजे, दुष्काळ काही आस्मानी संकट नाही, त्यात सुलतानीचा अंश महत्त्वाचा आहे.

शेतकऱ्यांची हलाखी ही केवळ पावसाच्या अनियमितपणामुळे होते हे म्हणणेही फारसे बरोबर नाही. युरोपातील बहुतेक देशांत प्रत्येक वर्षातील किती तरी महिने जमीन बर्फाच्छादित राहाते; पण तिथला शेतकरी काही देशोधडीला लागत नाही; इतर नागरिकांच्या बरोबरीने जीवनमान आणि सन्मान उपभोगतो.

दुष्काळसंबंधी आणखी एक गैरसमज पसरलेला आहे. जंगलतोड झाली, पृथ्वीवरचे नैसर्गिक आवरण संपले त्यामुळे पाऊस अनियमित झाला व त्यामुळे दुष्काळ चालू झाले असे मत थोर माणसे मोठ्या गंभीरपणे मांडतांना दिसतात. वनराई आणि पाऊसमान, विशेषतः मान्सून प्रदेशातील पाऊसमान कोणत घटक ठरवितात या विषयी गंभीर अभ्यासाला, खरे म्हटले तर, आत सुरुवात होत आहे. सूर्यावरील डागांपासून ते वाढत्या कारखान्यांच्या चिमण्यांतून बाहेर पडणाऱ्या धुरापर्यंत अनेक गोष्टींचा पाऊसमानावर परिणाम असू शकतो. काही घटक दूरकालीन आहेत, काही घटक हंगामी आहेत. दुर्गादेवीच्या दुष्काळाच्या वेळी महाराष्ट्रात सतत बारा वर्षे पाण्याचा एक थेंबही पडला नाही असे म्हणतात. त्या काळी तर महाराष्ट्रात घनदाट जंगलांची कोठे कमतरता नव्हती? तेव्हा, दुष्काळाची उपपत्ती अस्मानी संकटाशी लावणे आणि त्या अस्मानी संकटाचा बादरायणी संबंध केवळ वनस्पतीच्या आच्छादनाशी लावणे तर्कसुसंगत नाही. या पलिकडे जाऊन असेही म्हटले पाहिजे की तर्कविसंगती काही भोळेभाबडेपणतून आलेली नाही, त्यामागे काही निश्चित बुद्धी आहे.

या विषयावर आजपर्यंत माझ्या पाहाण्यात आलेली अत्यंत खोलवर विश्लेषण करून केलेली मांडणी म्हणजे डॉ. चारुदत्त दाभोळकर यांचे 'महाराष्ट्रातील दुष्काळ व त्यावरील उपाययोजना' हे पुस्तक. आपल्या वाचनात हे पुस्तक आले असेलच. आपण पुन्हा एकदा ते जरूर नजरेखालून घालावे.

अनेक लोकांमध्ये आणि विशेषतः पर्यावरणवाद्यांमध्ये असा विचार दिसतो की मोठ्या धरणयोजना या सगळ्या निरर्थक आहेत आणि त्या सर्व रद्द करून लहान पाणीपुरवठ्याच्या योजना आणि पारंपरिक पाणीसंकलनाच्या पद्धती यांवरच लक्ष केंद्रित केले पाहिजे. या विचारात काही तथ्य आहे; पण, बराचसा एकांगीपणाही आहे. १९५७ सालापासून, अंमलात आणलेल्या सर्व मोठ्या धरणयोजनांवर मी टीका केली आहे. या योजना प्रशासन, पुढारी आणि कंत्राटदार यांच्या सोयीसोयीच्या (Administration-friendly, Politician-friendly, contractor-friendly) असतात हे मी आग्रहाने सांगितले आहे. धरणाचे पाणलोट क्षेत्र आणि लाभक्षेत्र यांमध्ये प्राथमिक कार्यवाही न झाल्यामुळे धरणांवर खर्च झालेला बहुतेक पैसा गाळात गेला आहे. भूगर्भातील पाणी हे सिंचनव्यवस्थेतील मूलभूत अंग असले पाहिजे हेही मी आग्रहाने मांडले आहे. पण व्यापक पातळीवरील सिंचनव्यवस्थेत पाणलोट क्षेत्र व लाभक्षेत्र यांची योग्य ती निगा राखणाऱ्या मोठ्या धरणांचे महत्त्वाचे स्थान आहे हे नजरेआड करून चालणार नाही. महाराष्ट्रात दुष्काळ हटविण्यासाठी ज्या गोष्टी करावयास पाहिजेत त्यात 'कृष्णे'सारख्या योजनांचा अंतर्भाव असणे अपरिहार्य आहे. गेल्या काही दशकांत छोटे छोटे बंधारे, कोल्हापूर बांध, वसंत तलाव आणि पाझर तलाव यांची काही थोडीथोडकी कामे महाराष्ट्रात झाली नाहीत! पण या दुष्काळाच्या वर्षी पाझर तलावांच्या आसमंतातसुद्धा दुष्काळाची दाहकता लवांशानेही कमी नाही. आपल्या कार्यक्रमातील सर्व प्रकल्प पुरे झाले तरी त्यातून महाराष्ट्र सातत्याने सुजलाम् होऊन जाईल हे एक स्वप्नरंजन आहे.

महाराष्ट्र आहे हा असा आहे. भगीरथ प्रयत्नांनीसुद्धा तीस टक्क्यांच्या वर जमीन बागायती होऊ शकणार नाही, आणि अगदी अत्याधुनिक सिंचनाच्या प्रचंड भांडवली खर्चाच्या योजना अमलात आणल्या तरी महाराष्ट्राचा काही पंजाब होणार नाही. या वास्तवतेचा बोध घेऊन महाराष्ट्रात अर्थव्यवस्था, उद्योगधंद्यांची वाढ, शेतीचे स्वरूप, पिकवायची पिके आणि शेतीवर अवलंबून असणाऱ्या लोकसंख्येचे प्रमाण या संबंधी रूपरेषा ठरविली पाहिजे. सरकारने आणि प्रशासनाने आपलेच घोडे मधे दामटले नसते तर असा विकास निसर्गतःच झाला असता, तो आजपर्यंत झाला नाही.

आपल्या सर्व आराखड्यातील एका गोष्टीला मात्र माझा सक्त विरोध आहे. हे कार्यक्रम राबविण्यासाठी अधिकारी, अनुभवी तज्ज्ञ, पंचायत समितीचे सभापती, स्थानिक आमदार व बी. डी. ओ, ब्लॉकवार सल्लागार समित्या, सामाजिक, शैक्षणिक व सहकारी आदी क्षेत्रांना प्रतिनिधित्व, त्याखेरीज जिल्हाधिकारी, जिल्हा परिषदेचे अध्यक्ष, खासदार, पक्षांचे नेते इत्यादींचे जिल्हा

पातळीवर आणि मुख्यमंत्री यांच्या नेतृत्वाखाली राज्यस्तरीय समित्यांचे वर्चस्व मोठे भयावह आहे. आपल्या कार्यक्रमाचे नेतृत्व अशा तऱ्हेचे राहिले तर तो कार्यक्रम यशस्वीपणे अमलात येण्याची सुतराम शक्यता नाही. त्यातून फक्त पुढारी अधिकारी आणि संस्था यांचीच चंगळे होईल. जवाहर रोजगार योजनेचा अनुभव ताजा आहे, तरीही याच मार्गाने शासन जाणार आहे आणि अपयशी होणार आहे याची मला दुःखद जाणीव आहे.

बाहेरून गावात आलेला निधी कार्यक्षमतेने, ठरलेल्या कामासाठी वापरला जाण्याची काहीही शक्यता नाही. आणि शेतकऱ्यांचे अशा तऱ्हेची कामे स्वतःच्या ताकदीवर हाती घेण्याचे पिढ्या न् पिढ्यांच्या शोषणामुळे सामर्थ्य नाही. शेतीची संरचना (infrastructure) भांडवलनिर्मितीच्या अभावाने नष्ट झाली आहे. याला खरा कार्यक्षम उपाय म्हणजे शेतीमध्ये भांडवलनिर्मिती होऊ देणे हाच आहे. नव्या शासनाची खुली अर्थव्यवस्था शेतीलाही लागू केली गेली तर हे आपोआप घडून येईल. त्याला किती वर्षे लागतील कोणास ठाऊक?

तातडीने, दुष्काळ हटविण्यासाठी काही कामे गावोगावच्या शेतकऱ्यांनी हाती घ्यावी अशी प्रामाणिक इच्छा असेल तर त्यासाठी, काही वेगळी व्यवस्था लागेल. या कामी सरकारने सैरभैर पैसा उधळण्यापेक्षा, सहकारी संस्थातील भागभांडवलासारखी अडकून पडलेली रक्कम दुष्काळ निवारणाच्या कामाकरिता उपलब्ध करून दिली तर अशा योजना जास्त जबाबदारीने पार पाडल्या जातील. पण, या पत्राचा हेतू पर्यायी योजना देण्याचा नाही.

आपण पत्र लिहिलेत. शेतकरी संघटनेची दुष्काळ प्रश्नाविषयीची दहा वर्षे सातत्याने मांडली गेलेली भूमिका आपल्यासमोर ठेवण्याकरिता हे पत्र.

कळावे.

१० मे १९९२ आपला

**शरद जोशी**

# आजच्या 'स्वदेशी' चळवळीच्या निमित्ताने

गेले काही महिने देशात 'स्वदेशी' च्या आंदोलनाचे वारे वहाते आहे. वेगवेगळ्या संघटना व स्वयंसेवी संस्था आपापले वेगळे वेगळे झेंडे घेऊन बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या विरोधात देशी कारखानदारीच्या बाजून उभ्या ठाकल्या आहे. या संस्था, संघटनांकडून शेतकरी संघटनेने या आंदोलनांत सामील व्हावे यासाठी श्री. शरद जोशींना पत्रे येत आहेत. सध्याच्या 'स्वदेशी' आंदोलनाच्या संदर्भात आपली भूमिका मांडून शेतकरी संघटना या आंदोलनात भाग घेणार नसल्याचे शरद जोशींनी त्या सर्वांना कळविले आहे.

'समता आंदोलना' तर्फे लवकरच एक 'स्वदेशी तत्त्वदर्शन' शिबीर भरविण्यात येणार असून त्यात मार्गदर्शनाकरता यावे असे निमंत्रण देणारे पत्र समता आंदोलनाचे कार्यकर्ते श्री. विनय र. र. यांनी शरद जोशींना लिहिले होते. त्या पत्राला दिलेले हे उत्तर शेतकरी संघटनेची या 'स्वदेशी आंदोलना' विषयी भूमिका स्पष्ट करण्यास पुरेसे आहे.

## खुला आंतरराष्ट्रीय व्यापारच हितकारक

**श्री. विनय. र. र.**

स. न. वि. वि.

आपण मला पुणे आणि आंबेठाण येथे भेटण्याच्या खूप प्रयत्न केला. आपल्याला तसदी पडली.

आंतरराष्ट्रीय व्यापारात जागतिक राष्ट्रीय असे दृष्टीकोन फिरून फिरून चक्रनेमिक्रामाने येतच असतात. ज्या राष्ट्रांची औद्योगिक आणि व्यापारी क्षमता तुलनेने जास्त ते खुल्या व्यापाराची, मागणी करतात आणि दरिद्री माल उधळपट्टीने तयार करणारे राखीव कुरणे मिळविण्यासाठी स्वदेशीची मागणी करतात. आपल्या देशात दोन वास्तविकता आहेत. इंडिया आणि भारत. इंडियातील गचाळ आणि महागडा माल परदेशात खपण्याची शक्यता नसल्यामुळें ते स्वदेशीची मागणी करतात. भारतातील शेतकरी भारतीय शेतीचा सर्व मागासलेपणा लक्षात घेऊनही जगाशी स्पर्धा करण्याच्या अवस्थेत आहेत. त्यामुळें भारतीय शेतकऱ्यांचे हित आज खुल्या अनिर्बंध आंतरराष्ट्रीय व्यापारात आहे. पण सर्वच, निर्णय काही आर्थिक निकषांवर होतात असे नाही. जनांच्या राजकीय, सामाजिक, धार्मिक अस्मितांच्या रक्षणासाठी प्रसंगी आर्थिक हितविरोधीसुद्धा निर्णय घेतले गेल्याची इतिहासात नोंद आहे. यातील राष्ट्रीय अस्मितेचा कालखंड संपत आला आहे असा माझा विश्वास आहे. व्यापार जर राष्ट्रीय सरहद्दी ओलांडून गेला नाही तर संकुचित राजकीय हद्दी ओलांडण्याची ताकद असलेली धर्म ही एकमेव संस्था होईल ही शक्यताही मला भयानक वाटते.

जागतिक अनिर्बंध व्यापाराचा सद्यस्थितीत तरी मी पुरस्कर्ता आहे.

आपल्या परिसंवादात भाग घेऊन काही मोठे साध्य होईल असे वाटत नाही आणि येता काही काळ फक्त शेती आणि विश्रांती एवढाच कार्यक्रम अंमलात आणणार आहे. त्यामुळें आपले निमंत्रण स्वीकारता येत नाही. दिलगीर आहे.

आपला,

७ मे १९९२ **शरद जोशी**

**भीक नको घेऊ घामाचे दाम**

# शेतकरी संघटना कार्यकारिणी बैठक

## *१५ मे १९९२, गंगापूर (नाशिक)*

- ★ **शेतकरी संघटनेची घटना मंजूर**
- ★ **लक्ष्मीमुक्ती कार्यक्रमाचे मूल्यांकन**
- ★ **शेतकरी संघटक, प्रशिक्षण शिबीरे यांची नव्या संदर्भात आखणी**
- ★ **केंद्रीय कार्यालय वर्ध्याला**

शेतकरी संघटनेच्या कार्यकारिणीची बैठक शुक्रवार दि. १५ मे १९९२ रोजी नाशिकपासून सुमारे सात किलोमिटर अंतरावर गंगापूर रोडवरील श्री सोमेश्वर मंदिर परिसरात पार पडली. बैठकीला महाराष्ट्राच्या सर्व जिल्ह्यांतून कार्यकारिणीचे सदस्य हजर होते.

सुरूवातीला श्री. नरेंद्र अहिरे यांनी नाशिक जिल्ह्याच्या वतीने उपस्थित कार्यकारिणी सदस्यांचे स्वागत केले. बैठकीचे अध्यक्ष श्री. किशोर माथनकर यांनी बैठकीला सुरुवात करून श्री. शरद जोशी यांना बैठकीचे प्रास्ताविक करण्याची विनंती केली.

प्रास्तविकात शरद जोशींनी प्रथम महाराष्ट्रव्यापी 'माजघर शेती प्रदर्शनाचा' उद्देश सांगून तयारीच्या दृष्टीने पुरेसा वेळ मिळावा म्हणून हे प्रदर्शन येत्या मे महिन्याच्या ऐवजी सप्टेंबर किंवा ऑक्टोबर मध्ये भरविण्याची योजना असल्याचे सांगितले. मात्र या प्रदर्शनात भाग घेऊ इच्छिणाऱ्यांनी उन्हाळ्याच्याच दिवसात करावे लागणारे पदार्थ या उन्हाळ्यातच बनवून ठेवावे व तसे करतांना ते केवळ घरी वापरण्यासाठी करावयाचे नसून बाजारात मांडणी करून दाखविण्यासाठी आहेत हे लक्षात घेऊन आवश्यक त्या स्वच्छतेने, टापटीपीने व शुद्धतेचे बनवून ठेवावेत असे त्यांनी आग्रहाने सुचविले.

शेतकरी संघटनेच्या प्रस्तावित घटनेच्या मसुद्यासंबंधी बोलतांना त्यांनी शेतकरी संघटनेच्या आजपर्यंतच्या वेळोवेळीच्या बांधणीचा आढावा घेतला आणि आता, केवळ संघर्षात्मक आंदोलनाचा मार्ग संघटना अवलंबणार नसून शेगावचा चतुरंग शेतीचा आर्थिक कार्यक्रम राबविणार असल्याने इतके दिवस आवश्यक नसलेली घटना बनविणे आवश्यक झाले असल्याचे सांगितले.

कर्जमुक्ती अर्ज एकत्रितपणे मागे घेण्याची परवानगी देण्याचा सुप्रीम कोर्टाने दिलेला निर्णय म्हणजे खऱ्या अर्थाने कर्जमुक्ती आंदोलनाची सांगता असल्याचे सांगून या आंदोलनाच्या निमित्ताने शेतकऱ्यांनी जमविलेल्या निधीतील शिल्लक असलेली रक्कम जिल्ह्याजिल्ह्यात बचत खाती उघडून तिकडे वर्ग करावी असे त्यांनी सुचविले.

शेगाव मेळाव्यानंतरची (१० नोव्हेंबर १९९१) देशातील राजकीय व आर्थिक परिस्थिती यांचाही श्री. शरद जोशींनी या प्रास्तविकात आढावा घेतला.

★ खुल्या बाजारपेठेवर अवलंबून असणारी आयात निर्यात नीती तयार होईल व त्याचा फायदा शेतीक्षेत्राला मिळेल हे जितके सोपे वाटत होते तसा अनुभव आला नाही.

★ डॉ. मनमोहन सिंगांच्या धोरणाचा जुन्याच व्यवस्थेच्या सोयीसोयीने वापर केला जातो आहे. जेथे व्यवस्थेला ते सोयीचे वाटत नाही तेथे त्याच्या उलट धोरणाचाही वापर केला जात आहे.

★ खुली अर्थव्यवस्था 'इंडिया' पुरतीच येते आहे, 'भारता' साठी नेहरूधोरणच अधिक कडकपणे राबविले जात आहे.

★ शेतीमालाच्या निर्यातीसाठी वेगवेगळे लोक पुढे येऊ लागले आहेत.

★ खुली बाजारपेठ जगभर येत आहे असे ज्यावेळी वाटत होते त्याचवेळी, ज्या दोन धृवांभोवती - समाजवादी आणि भांडवलवादी - पृथ्वी फिरत होती त्यातील एक पडून गेला आहे. संपूर्ण जगाचा तोल सावरण्याइतका मुत्सद्दीपणा अमेरिकी राज्यकर्त्यांकडे आहे की नाही याबद्दल शंका आहे. खरे तर डंकेल प्रस्ताव शेतकऱ्यांच्या हिताचा होता पण इंडियनांनी त्याला विरोध केला.

★ आजकाल 'स्वदेशी' चळवळ सुरू झाली आहे ती 'अंबानी' स्वदेशी चळवळ आहे. तिच्या आधाराने क्षुद्रवाद्यांचे पुढे येणे शक्य आहे.

श्री. शरद जोशी यांनी आपल्या भाषणाच्या शेवटी जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांत शेतकरी महिला आघाडी व शेतकरी संघटना यांच्या उमेदवारांनी इतर विरोधी पक्षांच्या तुलनेत चांगले यश मिळविल्याबद्दल आनंद व्यक्त केला पण संपूर्ण महाराष्ट्रात काँग्रेसने ज्या बहुसंख्येने सत्ता हस्तगत केली त्याच्या तुलनेत हे यश काही फार मोठे नाही आवर्जून नमूद केले.

या प्रास्तविकानंतर शेतकरी संघटनेच्या अध्यक्षीय मंडळाचे अध्यक्ष व किसान समन्वय समितीचे अध्यक्ष श्री. विजय जावंधिया यांनी किसान समन्व समितीच्या दोन बैठका; गहू, कापूस आयातीच्या निर्णयासंबंधी शेतकऱ्यांच्यामध्ये असलेली नाराजी; ६ एप्रिल १९९२ रोजी दिल्लीच्या बोटक्लबवर झालेल्या शेतीमालाच्या होळीच्या रूपाने या नाराजीचे झालेले प्रकटीकरण यासंबंधी माहिती आपल्या सविस्तर भाषणातून दिली. ६ एप्रिलच्या दिल्लीच्या कार्यक्रमाला महाराष्ट्रातून हजारहून जास्त शेतकरी हजर होते याबद्दल त्यांनी आपल्या भाषणात आनंद व्यक्त केला. केंद्रिय कृषिमंत्री आजकाल शेतकऱ्यांना 'विकेल तेच पिकवा' हा

संघटनेचाच संदेश देत असतांनाच सरकारची धोरणे मात्र शेतीमालावरील वाहतूक बंदी, राज्यबंदी, जिल्हाबंदी इत्यादी निर्बंधांच्या साहाय्याने अजूनही शेतीमालाचे भाव पाडण्याचीच आहेत याबद्दल त्यांनी तीव्र संताप व्यक्त केला.

यानंतर कार्यकारिणीच्या या बैठकीत दुष्काळी परिस्थितीवर चर्चा झाली 'दुष्काळ ही नैसर्गिक आपत्ती नसून ती मानवनिर्मित आहे आणि शेतीमालाला रास्त भाव मिळाल्याशिवाय ती कायमची दूर होऊ शकत नाही' ही भूमिका कायम ठेवण्यात आली.

यानंतर घटना, शेतकरी संघटक प्रकाशने, प्रशिक्षण शिबीरे व लक्ष्मीमुक्ती या विषयांवर चर्चा होऊन वेगवेगळे निर्णय घेण्यात आले.

**घटना :** शेतकरी संघटनेच्या प्रस्तावित घटनेच्या मसुद्यावर चर्चा होऊन त्यात खालील बदल करून ती घटना म्हणून स्वीकारली गेली. (मसुदा दि. ६ मे १९९२ च्या अंकात प्रकाशित करण्यात आला आहे.)

* बांधणी संबंधीचा मुद्दा क्र. ८ च्या शेवटी पुढील मजकूर वाढविण्यात आला. ''...संघटनेच्या उद्दिष्टांसाठी आवश्यकता भासल्यास शेतकरी समाजातील वेगवेगळ्या घटकांचा आघाड्या तयार करणे.''

* मसुद्याच्या शवेटी दोन मुद्दे वाढविण्यात आले.

**१०. हिशोब :** शेतकरी संघटनेच्या आर्थिक व्यवहारासाठी निधी जमविणे, खर्च करणे, खर्चाचा हिशेब ठेवणे, हिशोबतपासनिसांची नियुक्ती करून हिशोबतपासणी करणे यांसबंधी सर्व व्यवस्था अध्यक्ष करतील.

**१०. कार्यालय :** संघटनेच्या मध्यवर्ती कार्यालयाची जागा ''१८, विवेकानंद मार्ग, वर्धा'' येथे राहील. या चर्चेनंतर पुढील ठराव होऊन शेतकरी संघटनेची घटना स्वीकारण्यात आली.

**ठराव क्र. १**

शेतकरी संघटनेची ही कार्यकारिणी शेतकरी संघटनेच्या या घटनेला मान्यता देत असून या घटनेनुसार 'शेतकरी संघटने' ची योग्य त्या कायद्यान्वये नोंदणी करून घेण्याचे सर्व अधिकार अध्यक्ष श्री. किशोर माथनकर यांस देत आहे.

या ठरावाची सूचना श्री. विजय जावंधिया यांनी केली व त्यास श्री. भास्करराव बोरावके यांनी त्यास अनुमोदन दिले.

त्यानंतर शेतकरी संघटनेच्या निधीसंबंधी ठराव अध्यक्षांनी मांडला.

**ठराव २**

शेतकरी संघटनेची ही कार्यकारिणी ठराव करते की,

कर्जमुक्ती आंदोलनाची सर्वोच्च न्यायालयाच्या अलिकडील निर्णयानंतर सांगता झाली आहे.

कर्जमुक्ती आंदोलनासाठी शेतकऱ्यांनी संघटनेकडे सुपूर्द केलेल्या निधीपैकी शिल्लक रकमेचा विनियोग खालीलप्रमाणे करण्यात यावा.

जिल्ह्यावार शेतकरी संघटनेच्या नावाने विभागवार खालील ठिकाणच्या बँकांत खाती उघडण्यात यावीत.

विदर्भ - वर्धा, मराठवाडा-नांदेड, पश्चिम व दक्षिण महाराष्ट्र – नाशिक आवश्यकतेप्रमाणे, ही खाती सुरूवातीस 'शेतकरी संघटना (संकल्पित), .........जिल्हा' अशा नावांनी काढावीत. संघटनेच्या नोंदणीनंतर खात्यांची नावे बदलून 'शेतकरी संघटना, ........जिल्हा' अशा तऱ्हेची करावीत.

प्रत्येक जिल्ह्याचे खाते चालविण्याचे अधिकार प्रत्येक जिल्ह्यात संघटनेचे प्रमुख व खालीलप्रमाणे कार्यकारिणीचे विभागावर प्रतिनिधी यांनी संयुक्तपणे चालावयाचे आहे.

**विदर्भ –** श्री. किशोर माथनकर (कार्यकारिणी सदस्य)

१. वर्धा - श्री. नंदकिशोर काळे
२. यवतमाळ - श्री. नितीन देशमुख
३. नागपुर - श्री. मदन कामडे
४. अमरावती श्री. संजय कोल्हे
५. चंद्रपूर - श्री. अशोक मुसळे
६. अकोला - श्री. ललीत बहाळे
७. बुलढाणा - श्री. नामदेवराव जाधव

**मराठवाडा –** श्री. शंकर धोंडगे (कार्यकारिणी सदस्य)

८. नांदेड - श्री. शिवाजी वाघ
९. परभणी - श्री. माणिकराव पवार
१०. लातूर - श्री. बाबुराव हाडोळे
११. औरंगाबाद - श्री. गोरख सोनवणे
१२. जालना - श्री. बापूराव महाराज परतूरकर
१३. उस्मानाबाद - ॲड. नेताजी गरड

**पश्चिम व दक्षिण महाराष्ट्र :**
श्री. रामचंद्रबापू पाटील (कार्यकारिणी सदस्य)

१५. नाशिक : श्री. गणपत कातड
१६. अहमदनगर : श्री. अनिल धनवट
१७. सोलापूर : श्री. शिवानंद दरेकर
१८. कोल्हापूर : श्री. बाबुराव मगदूम
१९. सांगली : श्री. रघुनाथराव पाटील
२०. पुणे : श्री. नंदकुमार लोखंडे
२१. रायगड : श्री. बाबुभाई जैन
२२. जळगाव : श्री. दगडू शेळके
२३ धुळे : श्री. खंडेराव भिलाजी पाटील.

कर्जमुक्ती आंदोलनातील शिल्लक रक्कम तातडीने वरील जिल्ह्यांतील खात्यात जमा करण्यात यावी.

**संघटक :** शेतकरी संघटकच्या खालावलेल्या वर्गणीदार संख्येबाबत चिंता व्यक्त करण्यात आली व वर्गणीदार वाढविण्याचे ठरविण्यात आले. तसेच, संघटकचे आजचे स्वरूप बदलून तो वर्गणीदारांपुरता मर्यादित न राहता 'स्टॉल' वर विकला जाण्याची शक्यता तयार व्हावी अशा स्वरूपासंबंधी योजना तयार करण्याचे काम दै. देशोन्नतीचे संपादक श्री. प्रकाश पोहरे यांच्यावर सोपविण्यात आली.

**प्रशिक्षण शिबीरे :** चतुरंग शेतीच्या नव्या कार्यक्रमानुसार सीताशेती, माजघरशेती, व्यापार शेती व निर्यात शेती यासंबंधी तांत्रिक व व्यावसायिक प्रशिक्षण देणारी शिबीरे आयोजित करण्याची शक्यता पडताळून पाहाण्याची जबाबदारी श्री. गोविंद जोशी यांच्यावर सोपविण्यात आली.

**लक्ष्मीमुक्ती :** लक्ष्मीमुक्तीचा कार्यक्रम अंमलात आणणाऱ्या गावांची संख्या इतकी झाली आहे की त्या सर्व गावी जाऊन त्यांचा सन्मान करणे एकट्या शरद जोशींना आता अशक्यप्राय आहे हे लक्षात घेता 'लक्ष्मीमुक्ती ग्रामगौरव समारंभा' साठी काही पर्यायी कार्यक्रम असणे आवश्यक झाले आहे.

दरम्यान, आजपर्यंत ज्या ज्या गावी लक्ष्मीमुक्तीचे कार्यक्रम पार पाडले गेले आहेत त्या

Posted at Market Yard, PSO, Pune 37.
On 21st May, 1992

**SHETKARI SANGHATAK**
(Marathi Fortnightly)
Regd. No. 39926/83
May 21, 1992

**To**

**PNCW 281**
Licence to post without prepayment
**No. 87**

गावांतील जमीन-हस्तांतरणाच्या बाबतीत नेमकी काय परिस्थिती आहे याची सविस्तर माहिति जिल्हा प्रमुखांनी गोळा करून आंबेठाणच्या कार्यालयाला कळवावी असे ठरले. तसेच, लक्ष्मीमुक्ती किती यशस्वीपणे अमलात आणली गेली आहे याची नमुना पहाणी करण्यासाठी एक समिति नियुक्त करण्यात आली. आ. सौ. सरोज काशीकर, गेल ऑमवेट व सुरेशचंद्र म्हात्रे या समितीचे सदस्य आहेत.

संघटक, प्रशिक्षण शिबीरे व लक्ष्मीमुक्ती यासंबंधीची ही सर्व कामे सप्टेंबर १९९२ च्या आत संबंधितांनी पुरी करावी असेही या बैठकीत ठरले.

सकाळी अकरा वाजता सुरू झालेली ही बैठक सायंकाळी सहा वाजता संपली. बैठकीची सर्व व्यवस्था जिल्हाप्रमुख गणपत कातड, सौ. स्मिता गुरव, श्री. मोहन गुंजाळ, श्री. नरेंद्र अहिरे व त्यांच्या नाशिक जिल्ह्यातील सर्व सहकाऱ्यांनी अत्यंत जिव्हाळ्याने केली होती.

# माजघर शेती प्रदर्शन

शेतकरी संघटकच्या ६ मे ९२ च्या अंकात महाराष्ट्रव्यापी 'माजघर शेती प्रदर्शना' संबंधी एक निवेदन दिले होते. परंतु १५ मे १९९२ रोजी झालेल्या शेतकरी संघटना कार्यकारिणीच्या बैठकीच्या वेळी असे निदर्शनास आले की मे महिन्याच्या शेवटी किंवा जूनमध्ये हे प्रदर्शन भरविण्याचे ठरले तर मिळणारा वेळ तयारीच्या दृष्टीने अपुरा पडेल. म्हणून आता हे प्रदर्शन येत्या सप्टेंबर किंवा ऑक्टोबर महिन्यात भरावावयाचे ठरले आहे.

तरीही, ज्या शेतकरी भावाबहिणींना या प्रदर्शनात भाग घ्यावयाचा आहे त्यांनी मागील निवेदनात सुचविल्याप्रमाणे आवश्यक ती माहिती, **'माजघर शेती प्रदर्शन' कार्यालय, अंगारमळा, आंबेठाण (४११९०१), ता. खेड. जि. पुणे** या पत्त्यावर पाठवून आपले नाव नोंदवावे.

माजघर प्रक्रियेतील बरेच पदार्थ हे उन्हाळ्याच्याच दिवसात बनवावे लागतात. त्यामुळे प्रदर्शन जरी सप्टेंबर-ऑक्टोबर मध्ये भरणार असले तरी असे पदार्थ प्रदर्शनात भाग घेऊ इच्छिणारांनी आताच बनवून आवेष्ठित (पॅकिंग) करून ठेवावेत. त्यावर, तो पदार्थ बनविण्याचा महिना व साल लिहून ठेवावा. हे पदार्थ आपण फक्त आपल्या घरगुती वापरासाठीच बनवीत नसून ते इतरांसमोर मांडून दाखविणार आहोत आणि त्याची मागणी नोंदविणार आहोत हे लक्षात घेऊन ते बनवितांना आवश्यक ती स्वच्छता, टापटीप आणि शुद्धता राखणे आवश्यक आहे.

**'माजघर शेती प्रदर्शन' कार्यालय**

**शेतीमालाच्या रास्त भावासाठी**
**चतुरंग शेतीला पर्याय नाही**

# शेतकऱ्यांच्या कैवाऱ्याची हत्या

कृषि उत्पादनखर्च व मूल्य आयोगाचे अध्यक्ष श्री. डी. एस्. त्यागी यांची दि. ८ मे १९९२ रोजी दिल्लीतील राहात्या घरी हत्या करण्यात आली. पंजाबमधील बब्बर खालसा गटाने या हत्येची जबाबदारी स्वीकारल्याच्या बातम्या वृत्तपत्रांत येऊन गेल्या.

या हत्येबद्दल प्रतिक्रिया व्यक्त करतांना शेतकरी संघटनेचे नेते श्री. शरद जोशी म्हणाले की अलिकडच्या काळात झालेल्या हत्यांमधील ही अत्यंत दुर्दैवी हत्या आहे. श्री. त्यागी यांनी त्यांनी ज्या ज्या अधिकारांवर कामे केली त्या त्या अधिकारपदांचा उपयोग शेतकऱ्यांची बाजू पुढे मांडण्यासाठीच केला. त्यांच्या हत्येमुळे शेतकरी आपल्या एका खऱ्याखुऱ्या मित्राला मुकले आहेत.

## शेतकरी संघटक

**वर्गणी पाठविण्याचा व पत्रव्यवहाराचा पत्ता**

**संपादक, शेतकरी संघटक,**
**अंगारमळा, आंबेठाण (४१० ५०१)**
**ता, खेड, जि. पुणे**

**पाक्षिक शेतकरी संघटक**
**मालक — मोहन बिहारीलाल परदेशी**
**मुद्रण स्थळ — चाकण प्रिंटिंग प्रेस, चाकण**

**संपादक, मुद्रक, प्रकाशक**
**सुरेशचंद्र म्हात्रे**
फोन : द्वारा ५०६८२

**६ व २१ तारखेला प्रसिद्ध होतो.**
**प्रकाशन स्थळ**
**११८७/६६ शिवाजीनगर, पुणे ४११ ००५.**